दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २९६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१९ जानेवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबईत नवजात बालकांची विक्री-खरेदी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश ; ९ जणांना अटक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने नवजात बालकांची विक्री व खरेदी करणार्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी ७ महिला आणि २ पुरुषांसह ९ जणांना अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये एक डॉक्टर, एक नर्स आणि एक लॅब टेक्निशियनचा समावेश आहे. गुन्हे शाखेच्या युनिट १ चे अधिकारी योगेश चव्हाण यांनी सांगितले की, ही टोळी मुलांच्या जन्मादात्यांकडून ६० हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत बाळांना विकत घेत असे आणि नंतर ज्या जोडप्यांना बाळांची गरज आहे अशांना अडीच लाख ते साडेतीन लाख रुपयांना विकत असे. अटक केलेल्या आरोपींमध्ये रुपाली वर्मा, निशा अहिरे, गुलशन खान, गीतांजली गायकवाड (नर्स), आरती सिंग (लॅब टेक्निशियन) आणि धनंजय बोगे(डॉक्टर) यांचा समावेश आहे. तीन आरोपींची नावं गुप्त ठेवण्यात आली आहेत.

# पनवेल तालुक्यात ९ ग्रामपंचायतीवर भाजप तर ८ ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ०९ ग्रामपंचायत भाजपने जिंकल्या. आकुर्ली ग्रामपंचायत यापूर्वीच पूर्ण बिनविरोध जिंकली असून पाली देवद, उमरोली, वाजे, खानाव, वारदोली, केवाळे, वाकडी, खैरवाडी, ग्रामपंचायत भाजपने जिंकून विरोधकांना पराभवाची धूळ चारली. तर आठ ग्रामपंचायती महाविकास आघाडीच्या ताब्यात ठेवण्यात त्यांना यश आले.

गेल्या अनेक वर्षांपासून शेकापच्या ताब्यात असलेल्या पालीदेवद, वाजे, खानाव, ग्रामपंचायतीत भाजपने कमालीची कामगिरी करत बाजी मारली. त्यामुळे शेकापच्या गोटात खळबळ माजली आहे. विजयासाठी भाजपच्या त्या-त्या भागातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. सर्व विजयी उमेदवारांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, एकनाथ भोपी, नगरसेवक प्रकाश बिनेदार, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान भाजपमध्ये उत्साहाचे तर शेकाप व महाविकास आघाडीमध्ये नैराश्याचे वातावरण होते.



पाली देवद ग्रामपंचायतीत चेतन पांडुरंग केणी, दिवेश भगत, पूनम भगत, प्राची अमित जाधव, पुष्पा पांडुरंग म्हसकर, ज्योती रविंद्र केणी, कविता पोपेटा, महेश पाटील, चंद्रकांत पोपेटा, योगिता पाटील हे निवडून आले असून अशोक पाटील आणि अनिता पाटील यापूर्वीच बिनविरोध विजयी आले आहेत. वाजे ग्रामपंचायतीत पदू नामदेव वाघ, काळी शाम कातकरी, अंजली राजेंद्र भालेकर, कमला किसन कातकरी, भारती शामकांत भालेकर, रेवन आत्माराम पाटील, मथुरा मदन पाटील, उमरोली ग्रामपंचायतीत रोशन शांताराम पोपटा, शुभांगी नरेश मढवी, अलका प्रकाश तांडेल, प्रितेश तुकाराम डांगरकर, कमला बळीराम मढवी, बेबी ठाकूर, श्वेता चंद्रकांत मढवी, किरण डांगरकर (बिनविरोध)मी रेश्मा पाटील (बिनविरोध), वारदोली ग्रामपंचायतीत राम पदू भवर, संगीता बाळू भूतांबरा, जानवी जितेंद्र बताले, दिनेश बाळाराम पाटील, हेमंत रघुनाथ तांडेल, सविता संतोष पाटील, अर्पिता अनंत पवार, खानाव ग्रामपंचायतीत बाळाराम कोंडू पाटील, जयश्री शशिकांत दिसले (दोन ठिकाणी), चंदा निलेश वारदे, हरिचंद्र भुऱ्या गोंधळी, निलम मनोहर अरिवले, केवाळे ग्रामपंचायतीत बारकी अंबो पारधी, रेणुका अशोक गायकर, कांचन परशुराम पालकर, करुणा रविंद्र गायकर, वलप ग्रामपंचायतीत नवनाथ महादू खुटारकर, ज्योत्स्ना राजेश पाटील, पाले बुद्रुक ग्रामपंचायतीत निलम गजानन भोईर, लक्ष्मण तुकाराम उलवेकर, सिद्धी संदीप तांडेल विजयी झाले. वाकडी ग्रामपंचायतीत ०९ पैकी ०६ तर खैरवाडी ग्रामपंचायतीत ०७ पैकी ०५ जागा जिंकून भाजपने वर्चस्व सिद्ध केले. तर पनवेल तालुक्यातील खानावळे, बारवई, देवळोली, सांगुर्ली, साई, कोळखे, आपटा आणि रसायनी या ग्रामपंचायतींवर विकास आघाडीने आपले वर्चस्व कायम ठेवले. शिवसेनेचे विद्यमान जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर शेठ भोईर, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार विवेक पाटील, राष्ट्रवादीचे सरचिटणीस प्रशांत पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आर.सी. घरत, कामगार नेते महेंद्र घरत, जे.डी.जोशी आदींसह पदाधिकारी यांनी विजयी उमेदवारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल तालुक्यातील २ ग्रामपंचायती यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्यामुळे महा विकास आघाडीच्या एकूण १० ग्रामपंचयतीवर वर्चस्व अबाधित राहिले आहे.

उरण विधानसभा मतदार संघातील व पनवेल तालुक्यातील सावळे, सांगुर्ली ग्रामपंचायतीत भाजपचा तसेच देवळोली ग्रामपंचायतीत भाजप व मित्रपक्षाच्या आघाडीने विजय मिळविला. सावळे ग्रामपंचायतीत सुनील माळी, रश्मी राम गाताडे, प्रशांत माळी, कांता कांबळे, सुरेखा कुरुंगळे, सतिश म्हसकर, प्रगती जांभुळकर, यांनी दणदणीत विजय मिळवून भाजपचा झेंडा फडकविला. सांगुर्ली ग्रामपंचायतीत पद्माकर कातकरी, सुवर्णा पाटील, वसंत पाटील, संतोष पारधी, निर्मला ठोकळ, शरद वांगीलकर यांनी विजय मिळवीत भाजपचा झेंडा फडकला. कोळखे ग्रामपंचायतीतीत भाजपच्या लीना राजेंद्र पाटील, सारिका राजेश सुरते, अपेक्षा जाधव, अशोक मुंढे विजयी झाले. पोसरी ग्रामपंचायतीत ०७ पैकी ०६ जागा जिंकून येथे शेकापच्या सत्तेला सुरुंग लावले.

## संक्षिप्त...

### समीर खान यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांना ड्रग्ज प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात खान यांना दिवसभराच्या चौकशीनंतर एनसीबीनं अटक केली होती.

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांच्या वांद्रे पश्चिम येथील घरातून तब्बल २०० किलो इतक्या मोठ्या प्रमाणावर गांजा जप्त करण्यात आला. त्यानंतर खान यांना अटक करण्यात आली होती. प्रक्रियेचा भाग म्हणून एनसीबीनं आज खान यांना वैद्यकीय चाचणीसाठी नेले. त्यानंतर त्यांना सुनावणीसाठी कोर्टात हजर केले. यावेळी, कोर्टाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. जावयाच्या अटकेनंतर मंत्री नवाब मलिक लगेचच ट्विट करत पहिली प्रतिक्रिया दिली होती. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. कोणताही पक्षपात न करता कायद्याने काम केले पाहिजे. कायदा त्याचे काम करेल आणि सत्य लवकर समोर येईल. आपल्या न्यायव्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास आहे,' असे मलिक यांनी ट्विटमध्ये म्हटले होते. मागील आठवड्यात एनसीबीच्या पथकानं खार परिसरातून तिघांना अटक केली होती. त्यात ब्रिटिश नागरिक करण सजनानी याच्यासह इतरही दोघांचा समावेश होता. त्यांच्या चौकशीतून 'मुच्छड पानवाला' आणि मलिक यांचे जावई समीर खान यांचे नाव पुढे आले होते. त्यानंतर एनसीबीने खान यांना चौकशीसाठी बोलावले. त्यांची सखोल चौकशी केल्यानंतर रात्री उशिरा त्यांना अटक करण्यात आली होती.

**जमीन विकणे आहे**

पाली-खोपोली मार्गावर नानोसे गावाजवळील पेट्रोल पंपाच्या समोर असलेली रोड टच २१ गुंठे शेतजमीन जागा विकणे आहे.

संपर्क : 8108618486

## पेण मधील सात ग्रामपंचायतींपैकी सहा ग्रामपंचायतीत शेकापचे वर्चस्व



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील सात ग्रामपंचायती निवडणूकांमध्ये शेकापक्षाने सहा ग्रामपंचायतींवर वर्चस्व ठेवले आहे. पेण तालुक्यातील कामार्ली, वाकरूल, आंबेघर, जोहे, खारपाले, बोर्झे व काळेश्री या सात ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत कामार्ली वाकरुल आंबेघर जोहे ,कालेश्री या सहा ग्रामपंचायतींवर शेकापक्षाने वर्चस्व मिळविले असून खारपाले ग्रामपंचायत आघाडीने जिंकली आहे. या अगोदरच कामार्ली मध्ये १० वाकरुल ५ आंबेघर ३ खारपाले ८ येथील उमेदवार बिनविरोध निवडून आले होते मात्र जोहे कालेश्री बोर्झे येथे सर्व जागांसाठी निवडणूक झाली.

मात्र त्याठिकाणीही शेकापक्षाने वर्चस्व ठेवल्याने पेण मध्ये सात पैकी सहा ग्रामपंचायती शेकापने जिंकून लालबावटा फडकवला आहे.यावेळी माजी आमदार धैर्यशील पाटील,जि.प.सदस्य प्रमोद पाटील, प्रभाकर म्हात्रे, कृषी सभापती शरद ऐरूणकर,पं.स.सभापती सरीता म्हात्रे, चिटणीस संजय डंगर, डी.एम. म्हात्रे,स्वप्निल म्हात्रे, सुरेश पाटील, राजा पाटील आदिंनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.यानंतर विजयी उमेदवारांचे शेकाप कार्यालय ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्येत विजयी मिरवणूक काढण्यात आली.

विधानसभेच्या निवडणुकीत शेकापक्षाला जरी हार मानावी लागली असली तरी .../२

## रोहा तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निकालात राष्ट्रवादी १२, सेना भाजपा ६, शेकाप २ ठिकाणी विजयी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील २१ ग्रामपंचायतीच्या निकालात राष्ट्रवादी शेकापला पारंपारिक ग्रा.पं.तीमध्ये जोरदार धक्का बसला. राष्ट्रवादी पक्षाचे प्रबल्य असलेल्या रोठ बुद्रुकमध्ये सेना भाजपा युतीने मुसंडी मारली. तर बालेकिल्ला असलेल्या वाशी ग्रा.पं.तीमध्ये सुरेश मगर गटाने राष्ट्रवादीचा पाडाव करीत सर्वच्या सर्व नऊ जागांवर दणदणीत विजय मिळवून ग्रा.पं.तीत राष्ट्रवादीला नो एन्ट्री केली आहे. या निकालात राष्ट्रवादीने १२ ग्रा.पं.चायतीवर सत्ता राखून तालुक्यावर वर्चस्व कायम ठेवले. सेना भाजपने तालुक्यात शेकाप राष्ट्रवादीला रोखून धरत ६ ग्रा.प. वर सत्ता मिळविली, शेका पक्षाकडे २ तर वाशी ग्रा.पं. अपक्ष सुरेश मगर गटाकडे गेली आहे.

सोमवारी ग्रा.पं. निवडणुक निकालात १२ ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादीला यश मिळाले असले तरी सबंध तालुक्याचे लक्ष लागलेल्या वाशी ग्रा.पं.तीत काँग्रेस पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष सुरेश मगर गटाने ९ पैकी ९ जागा जिंकत धाटाव पंचक्रोशीत प्राबल्य असलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे नाक कापले आहे. रोठ बुद्रुकमध्ये सेना भाजपा युतीने राष्ट्रवादीला रोखले असुन भाजपा युवक जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली या ग्रामपंचायतीवर बहुमत प्राप्त केले आहे. रोठ खुर्दमध्ये जनार्दन मोरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडीने दिनेश मोरेंचा पराभव करीत त्यांची विजयाची परंपरा खंडीत करित येथे सत्ता स्थापन केली आहे. अलिबाग मतदारसंघातील शेणवई, शेडसई, वावे पोटगे ग्रा.पं.तीत शिवसेनेने दमदार मुसंडी मारत शेकापला विधानसभेनंतर दुसऱ्यांदा जोरदार दणका दिला. कोंडगाव, महाळुंगेवर शेकापने लाल बावटा फडकवला. सेना भाजपा युतीला शेणवई, शेडसई, .../२

## उरणमधील पाच ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचे वर्चस्व ; वेश्वीमध्ये भाजपाचे कमळ



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या सहा ग्रामपंचायतीची निवडणुकी प्रक्रिया १५ जानेवारी रोजी पार पडली होती.या ग्रामपंचायतीचा निकाल तीन दिवसा नंतर लागणार असल्याने उमेदवार, पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या मनात धाकधूक वाटली होती. या सहा ग्रामपंचायतीच्या निकालाचे चित्र सोमवारी (दि१८) स्पष्ट झाले असून चाणजे, म्हातवली, नागाव, केगाव व फुंडे या पाच ग्रामपंचायतीवर शिवसेना, काँग्रेस, शेकाप महाविकास आघाडीने आपले उमेदवार विजयी करत आपल्या पक्षाचे वर्चस्व आघाडीच्या माध्यमातून सिध्द केले आहे.तर स्वबळाचा नारा देणाऱ्या भाजपाने वेश्वी ग्रामपंचायतीवर आपला कमळ फुलविला आहे.

उरण तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या चाणजे, म्हातवली, नागाव, केगाव, फुंडे आणि वेश्वी या सहा ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपा विरोधात शिवसेना ,काँग्रेस व शेकाप महाविकास आघाडी असा सामना रंगला होता. चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत शिवसेना महाविकास आघाडीचे ९ तर भाजपाचे ८ उमेदवार विजयी झाले आहेत.या ग्रुप ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेनेचे मंगेश थळी ( बाहुली ) हे सहाव्यांदा निवडून आले आहेत.तर भाजपाचे प्रदिप नाखवा यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

फुंडे ग्रामपंचायतीवर भाजपाची सत्ता होती. मात्र होऊ घातलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपाचे तरुण युवा नेते देवेंद्र ( डेविड ) म्हात्रे यांना ऐन ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपा पदाधिकाऱ्यानी डावल्याने ९ सदस्यांसाठी झालेल्या निवडणुकीत मतदारांनी भाजपाला नाकारुन महाविकास आघाडीच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या आहेत. त्यामुळे भाजपाला २ आकड्यांवर समाधान मानावे लागले आहे. महाविकास आघाडीचे ७ उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे देवेंद्र ( डेविड) म्हात्रे हे तटस्थ राहिल्याने हातातील सत्ता भाजपाने गमावली आहे. अशी चर्चा तालुक्यात, राजकिय गोटात .../२

## कधी सुधारणार 'आरोग्य' केंद्रातील सेवा?

**दै.रायगड नगरी । दिघी**

भंडारा जिल्हा रुग्णालयातील दुर्दैवी घटनेचे गांभीर्य प्रशासन घेत आहे. याच पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुका रुग्णालयातुन फायर ऑडिट तातडीने करावे अशा सूचना जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आल्या. मात्र, एकीकडे वारंवार सुविधांची मागणी आणि गरज असताना देखील ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष केले जात आहे.




श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. परिसरातील चाळीसहून अधिक गावांची आरोग्याची देखभाल या केंद्रावर अवलंबून आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे त्यावरील ताण वाढू लागला आहे. त्यामुळे वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करण्याची मागणी होत आहे, शिवाय .../२

## तळोजा परिसरात बेकायदेशीर वृक्षतोड ; स्थानिक नागरिकांचा विरोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकीकडे 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश सरकारकडून देण्यात येत आहे. तर दुसरीकडे तळोजा एमआयडीसी परिसरात मोठ्या संख्येने वृक्षतोड केली जात असून तोंडरे गावाच्या परिसरातील एका मोकळ्या भूखंडावर असलेल्या वृक्षाची बेकायदेशीर वृक्ष तोड केली असल्याची तक्रार तोंडरे गावातील नागरिकांनी केली आहे. याबाबत स्थानिकांनी विरोध दर्शवित गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.




पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी सरकारी यंत्रणांकडून वृक्षारोपणाचा संकल्प करून 'झाडे लावा, झाडे जगवा' अशा प्रकारचा संदेश दिला जात आहे. पनवेल महापालिकेने यासाठी खास जैवविविधता नियंत्रण समिती स्थापन केली आहे. त्यातून ते पशूपक्षी त्याचबरोबर .../२

# आत्मविश्वासाची लस

जगभरात भयाची लाट निर्माण केलेल्या, बहुतेक देशांतील सर्व व्यवहार सहा-सात महिने ठप्प ठेवलेल्या आणि मानवासमोर आव्हान निर्माण केलेल्या करोना विषाणूला रोखण्यासाठी देशभरात सुरू झालेली लसीकरणाची मोहीम दिलासा देणारी आणि आशा निर्माण करणारी आहेच; परंतु ती अभिनंदनीय आणि ऐतिहासिकही आहे. अभिनंदन यासाठी, की देशात कोव्हिडचा पहिला रुग्ण आढळला त्याला एक वर्ष आणि ब्रिटनमध्ये कोव्हिडवरील पहिली लस टोचली गेली त्याला सव्वा महिना पूर्ण व्हायच्या आत लसीकरणास सुरुवात झाली; आणि ऐतिहासिक यासाठी, की १३० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या देशात इतक्या अल्पावधीत लसीकरणापर्यंतचा टप्पा गाठला गेला. ही साधी आणि सोपी गोष्ट नाही. कोव्हिडची महासाथ सुरू झाल्यानंतर तिला प्रतिसाद देताना केंद्र आणि राज्य सरकारांनी ज्या चुका केल्या, लॉकडाउन जाहीर करण्यापासून उपचार केंद्रे उभारण्यापर्यंत जी संभ्रमावस्था त्यांनी काही काळ निर्माण केली, ती पाहता लसीकरणाची मोहीम सुरू होणे काहींना अविश्वसनीय वाटू शकते. सार्वजनिक आरोग्यासाठी लक्षणीय तरतूद नसताना आणि संपूर्ण आरोग्य व्यवस्थाच अतिदक्षता विभागात असताना, कोव्हिडचा सामना करणे, रुग्णसंख्या आटोक्यात ठेवणे, मृत्यूदर कमी करणे आणि 'ऑक्सफर्ड'ची लस विकसित होताना, ' कोव्हॅक्सीन' ही स्वदेशी लस विकसित करणे या सोप्या गोष्टी नाहीत. त्या साध्य करून भारताने जगाला आपली क्षमता दाखवून दिली आहे. हा देश अनेक प्रश्नांनी, समस्यांनी वेढला गेला आहे; येथील यंत्रणा भ्रष्टाचाराने पोखरलेल्या आहेत आणि येथे कशाचेही राजकारण होते; हे सारे खरे असले, तरी संकटाच्या आणि आव्हानांच्या वेळी अवघा देश एकवटतो आणि त्याचा यशस्वी सामना करतो, असा इतिहास आहे. अणुकार्यक्रम असो की अवकाश कार्यक्रम; महासंगणकाची निर्मिती असो की माहिती तंत्रज्ञान; त्या त्या वेळची आव्हाने भारताने यशस्वीपणे पेलली आहेत. त्याचीच पुनरावृत्ती लसीकरणातून होत आहे. 'कोव्हिड'ला प्रतिसाद देण्यापासून लस वितरित करण्यापर्यंतच्या अनेक गोष्टींवर आजही राजकारण होत आहे, आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत, स्वदेशी बनावटीच्या लसीबाबत साशंकता आणि भीती व्यक्त होत आहे, लसीकरणासाठी बनविण्यात आलेल्या ॲपमधील तांत्रिक अडचणींमुळे गोंधळही निर्माण झाला आहे; परंतु लसीकरणानंतर गंभीर दुष्परिणामांच्या मोठ्या घटना घडल्या नसल्याने लसीकरणाचा हा पहिला टप्पा अभिनंदनास पात्र ठरणारा आहे. करोनामुळे जीवितहानी झाली. प्रचंड आर्थिक हानी झाली. उद्योग, व्यापार-उदीम ठप्प झाले. कोट्यवधींचे रोजगार गेले. लाखोंना स्थलांतरित व्हावे लागले. आता रुग्णसंख्येचा आलेख खालावत असल्याने निर्बंध शिथिल होत आहेत आणि त्यामुळे काही प्रमाणात व्यवहार पूर्ववत होत आहेत. करोनासह जगण्याच्या 'नवसाधारण स्थिती'ला सर्व जण जुळवून घेत असले, तरी करोनापूर्व स्थिती निर्माण होण्यासाठी प्रतिबंधक लस असणे गरजेचे होते. ती विकसित करण्यासाठी जगभरातील संशोधकांना यश आले आणि ब्रिटन, अमेरिका, रशिया, चीन येथे लस विकसित झाली. भारतही याच देशांच्या पंक्तीत असून, येथे एका स्वदेशी लसीसह तीन लशी उपलब्ध झाल्या आहेत. शनिवारपासून सुरू झालेल्या लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यात, करोनाबाधितांवरील उपचारांत आघाडीवर असलेल्या तीन कोटी आरोग्य कर्मचाऱ्यांना लस दिली जात आहे. त्यानंतर पुढील टप्प्यात आणखी २७ कोटी जणांना लस देण्याचे नियोजन असून, हा कार्यक्रम वर्षभर चालणारा आहे. इतक्या मोठ्या संख्येला लस देण्याचे आव्हान सोपे नाही. तथापि, पहिला तीन कोटींच्या लसीकरणाचा टप्पा यशस्वीपणे पार पडल्यास पुढील मोहीम सोपी होऊ शकेल. कोणाला लस द्यावी, कशी द्यावी यांबाबतची प्रमाणित प्रक्रियाही तयार आहे. लस आल्याने वातावरणात सकारात्मकता निर्माण झाली असून, लसीकरण यशस्वी झाल्यास लोक अधिक आत्मविश्वासाने आपल्या कामांना लागतील. रुग्णसंख्या कमी होत असल्याने करोनाच्या विरोधात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली असावी, अशी शक्यताही तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. करोनामुळे ठप्प पडलेले सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणे सुरू करण्याला या घडामोडी पूरक आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी 'अनलॉक'च्या प्रक्रियेला गती द्यायला हवी. लस घेतल्यानंतरही मास्क वापरण्यापासून सुरक्षित वावरापर्यंतचे करोनासाठीचे नियम पाळण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेले आवाहन योग्यच आहे. या नवसाधारण स्थितीची जनतेलाही आता सवय झाली आहे; नियमांचे उल्लंघन करणे ही एक वृत्ती असून, तिला पायबंद घालण्याची यंत्रणा यापूर्वीच उभारण्यात आली आहे. त्यामुळे लसीकरणाच्या व्यापक मोहिमेबरोबरच सर्व महाविद्यालये उघडण्यापासून मुंबईसारख्या महानगरांतील लोकल सुरू करण्यापर्यंतचे निर्णय घेण्याची वेळ आली आहे; लशीने तसा आत्मविश्वास निर्माण केला आहे.

# बांबूपासून शोभिवंत वस्तूंचे प्रशिक्षण शिबीर





**दै.रायगड नगरी । कळंबोली**

पनवेल जवळील सातारा येथील युसूफ मेहेरअली सेंटर मधू प्रमिला दंडवते संकुला मुद्दे बांबूपासून तयार करण्यात येणाऱ्या विविध कलाकृतींचे प्रशिक्षण शिबिर १९ जानेवारी ते २१ जानेवारी या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये रायगड जिल्ह्यातील इच्छुक करून तरुणींना स्वयंरोजगार प्रशिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्यासाठी शिबिरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संयोजक अनिल हेब्बार यांनी केले आहे. या शिबिरात त्रिपुरा राज्यातील मान्यवर प्रशिक्षक फॉरेस्ट रिसर्च सेंटर फॉर लायव्हहुड एक्स्टेंशन त्रिपुरा भारत सरकार हेलपिंग अँड व युसूफ मेहेरअली सेंटर च्या वतीने बांबूपासून अनेक शोभिवंत आकर्षक वस्तू बनवणे यांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिले जाणार आहे.

ग्रामीण भागात भागातील तरुण-तरुणींनी निसर्गामध्ये उपलब्ध असणाऱ्या साधनसामुग्री पासून आकर्षक व मजबूत उत्पादने बनवून त्याद्वारे स्वावलंबन ना चे धडे घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आव्हान केलेल्या आत्मनिर्भर भारत या संकल्पनेतून या सेंटरमध्ये बांबूपासून तयार करण्यात येणाऱ्या कलाकृतीचे प्रशिक्षण तारा येथील युसुफ मेहेरअली सेंटर मध्ये दिले जाणार आहे.

१९ जानेवारी ते २१ जानेवारी या तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी त्रिपुरा येथील मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत. जे तरुण-तरुणी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतील त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच त्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना विक्रीची हमी ही सेंटर देणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन स्वातंत्र्य सेनानी डॉ. जी जी परीख यांच्या हस्ते करण्यात येणार असून या प्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीमती शशिकला अहिरराव, प्रकल्प अधीकारी आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प कोकण विभाग ह्या उपस्थित राहणार आहेत.

# पेण येथील आरोग्य शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड.मंगेश नेणे यांच्या वाढदिवसाचे निमित्त निशब्द क्रिएशन सामाजिक सांस्कृतिक संस्था आणि वेदिका पॉलीक्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने पेण येथील डॉ. बाबासाहेब प्राथमिक शाळा कोबडपाडा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उदघाटन बापुसाहेब नेने यांचे हस्ते करण्यात आले, यावेळी मंगेश नेने, डॉ विजया कदम, विजय कदम निळेश म्हात्रे आदि उपस्थित होते. या शिबिरात नेत्र तपासणी तसेच मधुमेह, त्वचारोग, रक्तदाब, ईसीजी, हाडाचीं तसेच स्त्रियांची तपासणी करण्यात आली. तसेच आदिवासी कुंटुबाना खाऊचे वाटप व त्याची आरोग्य तपासणी करण्यात आली.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी श्रीवर्धनमधील मौजे रानवली येथील जागा हस्तांतरित

## जिल्हा विकासासाठी पालकमंत्री आदिती तटकरेंचा आणखी एक महत्वाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, रानवली, ता.श्रीवर्धन या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

तद्नंतर या प्रकरणी ग्रुप ग्रामपंचायत रानवली यांनी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, रानवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड या इमारतीसाठी मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे जमीन वर्ग करण्यासंदर्भात विनंती केली होती. या जमिनीबाबत चौकशी करुन उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांनी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना रानवली, ता.श्रीवर्धन, या इमारतीसाठी मौजे रानवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.२९२, क्षेत्र ००-२०-०० हे.आर पैकी ०-०४-०० हे.आर.ही जमीन ग्रामपंचायत रानवली यांच्याकडून शासनाकडे पुनर्ग्रहण करण्यात आली असून महसूलमुक्त व सारामाफीने मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राज्यस्तरीय पशुवैदयकीय दवाखाना रानवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड या इमारतीच्या बांधकामाकरीता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी दिले आहेत.

# माणगांव तालुक्यातील बामणोली ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीची सरशी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील झालेल्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीत महत्वाची समजल्या जाणाऱ्या बामणोली ग्रामपंचायतीचा निकाल दि. १८ जानेवारी रोजी लागला आहे. बामणोली ग्रामपंचायतीत ९ जागांपैकी ५ सदस्य बिनविरोध देण्यात आले होते. दि. १५ जानेवारी रोजी उर्वरीत जागांकरीता नेत्रुत्व सिद्ध करण्यासाठी चार(४) जागांवर निवडणुक घेण्यात आली. ग्राम पंचायतमधील निवडणूक मोठी चुरशीची झाली. या निवडणुकीत महाविकास आघाडीचे भारत राम पवार, सुशांत बाळाराम पडवळ, उज्वला शैलेश पाखुर्डे, स्वाती संदेश पाखुर्डे हे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.



बामणोली ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीच्या विजयी उमेदवारांनी विजयाचे श्रेय स्वत:कडे न घेता या विजयासाठी सर्व मतदार व ग्रामस्थांचे आभार मानले त्यांचे अभिनंदन केले आहे. येत्या काळात सर्वांना सोबत घेऊन ग्रामपंचायत मार्फत लोकहिताची कामे करण्यावर जास्त भर देऊन बामणोली ग्रामपंचायत तालुक्यात विकासकामात अव्वल असेल असा विजयी उमेदवार भारत पवार यांनी विश्वास व्यक्त केला आहे.


दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


# उरण कोटगाव ग्रामस्थांचे ११ व्या दिवशीही उपोषण सुरूच

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील कोटगाव ग्रामस्थांनी आपल्या न्याय हक्कासाठी उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाचा ११ वा दिवस आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे.

उरण कोटगाव ग्रामस्थांची जमीन शासनाने संपादित केली आहे. आज त्याठिकाणी रेल्वे स्टेशनचे काम सुरू आहे. परंतु बाधित शेतकऱ्यांना आजच्या घडीला मोबदला मिळाला नसल्यानेच ग्रामस्थांनी उपोषणाचे पाऊल उचलले आहे. सदरचे काम बंद करून कोटगाव ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले आहे.

आज उपोषण सुरू करून ११ दिवसाचा अवधी उलटून गेला आहे. उपोषणाला शिवसेनेचे उजिल्हाउपप्रमुख नरेश रहाळकर यांनी भेट देऊन पाठींबा दिला आहे. कोटगाव ग्रामस्थांनी बाधित शेतकऱ्यांना मोबदला त्याचबरोबर येथील स्थानिकांना नोकरभरतीत प्राधान्य देणे आदी मागण्यांसाठी हे उपोषण सुरू केले आहे. कोटगाव ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित राहून उपोषणाला पाठबळ देत आहेत. जोपर्यंत कोटगाव ग्रामस्थांना न्याय मिळत नाही तोपर्यंत हे उपोषण असेच सुरू राहील असा इशारा कोटगाव ग्रामस्थ अध्यक्ष नवनीत भोईर यांनी दिला आहे.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## सहा ग्रामपंचायतीत शेकापचे वर्चस्व

शेकापच्या बहाद्दर कार्यत्यानी एक वर्षाच्या आतच आपले वर्चस्व या निवडणुकीत दाखवून दिले आहे म्हणून पेण तालुक्यातील ग्रामपंचायतीवर शेकापने वर्चस्व ठेवले असल्याने सर्वसामान्य जनतेसाठी सातत्याने लढणारा पक्ष हा शेकापक्षच आसल्याचे माजी आमदार धैर्यक्षिल पाटील यांनी सांगितले.

## पाच ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचे वर्चस्व

वर्तवली जात आहे. नागाव ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ११ सदस्यांसाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे ६ तर भाजपचे ५ उमेदवार विजयी झाले आहेत.भाजपाचे युवा नेते भुपेन घरत यांनी माजी सरपंच परिक्षित ठाकूर यांचा पराभव केला आहे.म्हातवली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ११ सदस्यांसाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे ६ तर भाजपचे ५ उमेदवार विजयी झाले आहेत. केगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या निवडणुकीतील ११ सदस्य संख्या बळासाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे १० उमेदवार विजयी झाले आहेत.तर भाजपला १ का विजयी उमेदवारांवर समाधान मानावे लागले आहे. वेश्वी ग्रुप ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ९ सदस्यांसाठी झालेल्या निवडणुकीत ३ उमेदवार हे बिनविरोध निवडून आल्याने ६ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी, जनशक्ती आणि भाजपा असा तिरंगी सामना रंगला होता.मात्र वेश्वी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास पाटील,निवृत्त ग्रामविकास अधिकारी के.बी.पाटील यांनी कृष्णाची भूमिका बजावल्याने महाविकास आघाडी, जनशक्ती या उमेदवारांना हार पत्करावी लागली आहे.एकंदरीत गावाच्या विकासासाठी वेश्वी ग्रामपंचायतीवर विलास पाटीलच्या रुपाने पुन्हा एकदा कमळ फुलला आहे.

## राष्ट्रवादी १२, सेना भाजपा ६, शेकाप २ ठिकाणी विजयी

वावेपोटगे, ऐनघर, निडीतर्फे अष्टमीत जोरदार एन्ट्री मिळाली आहे. कोलाड विभागात राष्ट्रवादीने खांब, गोवे, चिंचवली तर्फे दिवाळी तिसे आपल्याकडे ठेवली. धामणसई, मालसईत राष्ट्रवादी सेना आघाडीत बिघाडी झाली. याचा फटका सेनेला बसला. दोन्ही ग्रा.पं.तीवर राष्ट्रवादीने दमदार वर्चस्व राखले. तळाघर, घोसाळे, वरसेत राष्ट्रवादीला विजय मिळाले. नागोठणेतील पळसमध्ये राष्ट्रवादीचे शिवराम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली वर्चस्व पुन्हा कायम राहिले. ऐनघर ग्रामपंचायतीत शिवसेनेला तब्बल १४ जागा मिळाल्याने सेना प्रबळ ठरली. सबंध तालुक्याचे लक्ष लागलेल्या वाशीत राष्ट्रवादीची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. तर काँग्रेस पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष सुरेश मगर हे मास लिडर ठरले, वाशी मध्ये मतदारांनी राष्ट्रवादीला सपशेल नाकारले, त्यांनीच परिवर्तन घडवून आणले अशी प्रतिक्रिया सुरेश मगर यांनी दिली आहे. दरम्यान, ग्रामपंचायत निकालातून तालुका राजकारणात सेना भाजपाने पुन्हा नव्या दमाने एन्ट्री केली, हा शेकाप, राष्ट्रवादीला मोठा धक्का असल्याचे राजकीय विश्लेषकांतून बोलले जात आहे.

## कधी सुधारणार 'आरोग्य' केंद्रातील सेवा?

सध्या असलेल्या प्रा. आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळावा अशी मागणीही केली जात आहे. मात्र, बाहेरून रंगरंगोटीने सजलेल्या रुग्णालयातील आतील बांधकामाची दुरवस्था आहे. आरोग्याच्या असुविधांसोबत अग्निशमन यंत्रणच नाहीत अशा रुग्णालयात फायर सेफ्टी ऑडिट करून घेण्याच्या सूचना जिल्हा आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहेत. बोर्लीपंचतन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भव्य इमारतीच्या बांधकामाची पडझड झाली आहे. तर बांधकाम खात्याकडून इमारत आरोग्य खात्याकडे हस्थांतर न झाल्याने त्याची माहिती आरोग्य खात्याकडे नसल्याचे माहिती मिळते. प्रा. आरोग्य केंद्राच्या रखडलेल्या व् निकृष्ट दर्जाच्या बांधकामा बद्दल रुग्ण नाराजी व्यक्त करतात. इमारतीच्या दोन्ही मजल्यावरील बांधकामाला तडे गेले आहेत. लादयांचे काम, डॉक्टर व् कर्मचार्यांच्या स्टाफ क्वार्टर दुरावस्थेत आहेत. सध्या फक्त इमारतीच्या तळमजल्याचा रुग्ण तपासणीसाठी उपयोग केला जातो. येथील शस्त्रक्रिया विभाग बंदच आहे, शिवाय तेथील बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने ते पडलेले दिसते. श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्यसेवेला सक्षम करण्यासाठी या ठिकाणी सोनोग्राफी, एक्सरे मशीन, रक्त चाचण्यांसाठी मशीन, हिवताप आरोग्य विभाग व शल्यचिकित्सक वैद्यकीय अधिकारी असावे. अशी मागणी सातत्याने होत आहे. कमी प्रमाणात कर्मचारी, वैद्यकीय अधिका-यांची कमतरता असतानाही मोजक्या कर्मचाऱ्यांवर मोठ्या कार्यक्षेत्राचा भार पडल्यामुळे कामातील त्रुटी वाढल्या आहेत. परिणामी योग्य आणि सक्षम वैद्यकीय सेवा देणे शक्य होत नाही. त्यामुळेच बोर्लीपंचतन मध्ये ग्रामीण रुग्णालयाची गरज आहे. सध्या फक्त इमारतीच्या तळमज्ल्याचा रुग्ण तपासणी साठी उपयोग केला जातो. येथील शस्त्रक्रिया विभाग बंदच आहे, शिवाय तेथील बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने ते पडलेले दिसते. सद्यस्थितीत या विभागाचा उपयोग हा गाद्या व लसीकरणाच्या पेट्या ठेवण्यासाठी केला जातो.

## तळोजा परिसरात बेकायदेशीर वृक्षतोड

वनस्पतींचे संवर्धन केले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे; पण महानगरपालिकेच्या हद्दीतील तळोजा एमआयडीसीच्या बाजूला तोंडरे गावालगत असलेल्या परफॉर्मन्स केमिसर्व्ह प्रा.लि. कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या ४० एकर शेत जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. महापालिका प्रशासन मात्र याबाबत अनभिज्ञ आहे. त्यामध्ये आंबा, कडुलिंब, ऐन, नारळ यांसारख्या अनेक झाडांचा समावेश आहे. तळोजा एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. हवेत विषारी वायू सोडले जात आहेत. या भागात वृक्षावळ असणे गरजेचे आहे; परंतु तोंडरे गावात मोठी वृक्षतोड सुरू आहे. या ठिकाणी खूप मोठ्या संख्येने झाडे होती. त्याची सर्रास तोड करण्याचे काम सध्या सुरू आहे. याबाबत ग्रामस्थांना हि माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी पोहोचले असता त्या ठिकाणी हुंडाई कंपनीची पोकलन मशीनने झाडे तोडण्याचे काम सुरु होते. ग्रामस्थांकडून सदर मशीन चालकाला झाडे तोडू नका असे सांगण्यात आले, तसेच कोणाच्या सांगण्यावरून झाडे तोड चालू आहेत याची विचारणा केली असता मशीनचा ड्रायव्हर त्या ठिकाणाहून काही माहिती न देता मशीन जागेवर ठेवून तिथून निघून गेला. मात्र महापालिकेने परवानगी दिली असली तरी इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षांची तोड कशी होऊ शकते? असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे. तोंडरे येथे जी वृक्षांची कत्तल झाली याविषयी चौकशी व्हावी आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नगरसेवक, नगरसेविका व ग्रामस्थांनी केली आहे. केली.पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून तळोजातील वृक्षतोड अतिशय गंभीर बाब आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# आंबोली ग्रामपंचायत निवडणूक : श्री बापदेव विकास परिवर्तन पॅनलचे घवघवीत यश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

केवळ गावाच्या विकासासाठी आणि एका नव्या उगमाकडे नेण्यासाठी स्वप्नवत मार्गक्रमण करतांना आंबोली ग्रामपंचायत मध्ये सत्तेचा भाग नसताना देखील गावाला विकासाच्या प्रवाहात नेण्यासाठी प्रस्थापितांच्या विरोधात झपाटून कामे करत राजकीय क्षेत्रातील नव्याने पाऊल ठेवणाऱ्या शरद सखाराम शिंदे या उमद्या युवकाने आपल्या मित्रमंडळींबरोबर, जेष्ठांबरोबर निवडणुकीला सामोरे जाताना प्रस्थापित असलेल्या बापदेव ग्रामविकास पॅनलला अक्षरशः शरणागती पत्करायला लावून आपल्या श्री बापदेव विकास परिवर्तन पॅनलला भरघोस मतांची विजयश्री मिळवून देण्यासाठी गावातील तरुण कार्यकर्ते मच्छिंद्र लोहोट, माजी सरपंच लक्ष्मण शिंदे, कैलास शिंदे, दत्तात्रय शिंदे, श्रीपती सुतार, निलेश शिंदे, शाम शिंदे, निखील शिंदे, सुरेश शिंदे, कुंडलिक काळडोके, महादेव खुटवड, कचराबाई, छायाताई, कांताबाई, प्रभाकर काळडोके, हरी शिंदे, जयसिंग शिंदे, रघु शिंदे, स्वप्नील शिंदे, हरी शिंदे, सुदाम शिंदे, चंदु पाटील शिंदे, अशोक कोकणे, दिनकर शिंदे, रोहीदास शिंदे, अरुण शिंदे, अतुल शिंदे, धनंजय शिंदे, अरविंद दत्तात्रय काळडोके, संजय लोहोट, अशोक शिंदे, सुरेश शिंदे फणसेवाडी, निवृत्ती शिंदे, रामदास केदारी, शंकर शिंदे, सुदाम शिंदे यांनी शर्थीचे प्रयत्न केले आहेत.



शरद सारख्या तरुणांचा राजकीय झंझावात आणि सुरू असलेला प्रस्थापितांविरुद्धचा लढा केवळ ग्रामस्थाच्या सहकार्याने यशस्वी झाला आहे.बापदेव विकास परिवर्तन पॅनलचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर याच पॅनेलच्या पुष्पाताई शिंदे यांच्या वार्डात अक्षरशः प्रतिष्ठेची लढत झाली त्यांच्या विरोधात अनेक दिग्गज मंडळींनी रणशिंग फुंकले होते. त्यामुळे या अत्यंत चुरशीच्या लढतीत त्यांना निसटत्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. ही निवडणूक खूपच चुरशीची आणि प्रतिष्ठेचा विषय बनल्यामुळे शरद शिंदे यांचे माथेरान मधील मोठे बंधू नगरपरिषदेच्या राजकीय क्षेत्रातील अभ्यासू नगरसेवक, विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे यांनी यावेळी आपला अमूल्य वेळ सखोल अभ्याससह आपले मित्र मंडळी भावकी व नात्या गोत्यात जाऊन प्रचार केला होताआणि तीन दिवस शिवाजी शिंदे हे सुध्दा या प्रतिष्ठेच्या निवडणुकी साठी तळ ठोकून राहिले होते.

गावातील सुज्ञ मतदारांच्या सहकार्याने जे परिवर्तन घडवून आणले आहे ते खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.या परिवर्तनाच्या लढाईत गावातील भावकी, नातेवाईक, पॅनल प्रमुख, सुदामजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, गावातील महिला, तरुणांची फळी यांच्या प्रचंड पाठींब्याच्या बळावर हे शक्य झालेय हे सगळे यश कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे आहे. या पॅनल साठी काम करणा–या सर्व मंडळींचे अभिनंदन. नकुशाताई, विष्णु, व दत्ता यांचा विजयाने गावात नवचैतन्य पसरलेय. खरे विजयाचे शिल्पकार आपण आहात.येणार्या काळात सगळयांना बरोबर घेऊन, जेष्ठांचा मार्गदर्शनाखाली गाव विकासाचा शिखरावर व सगळयांचा समतोल विकास घडवुन आणण्यासाठी नक्कीच प्रयत्नशील राहू असे नवनिर्वाचित विजयी उमेदवार शरद शिंदे यांनी सांगितले आहे.

**शरदचे शालेय शिक्षण माथेरान मध्ये झाले माथेरानच्या मातीत रूळलेला क्रिकेटच मैदान गाजवणाऱ्या शरदने ग्रामपंचायत निवडणुकीत विजय मिळवून राजकारणात दमदार एट्री केली आहे तो माझ्या दिशा क्लासेसचा विदयार्थी होता आमच्या सर्वाकडून त्याच मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचाली साठी शुभेच्छा.**

**योगेश जाधव-दिशा क्लासेस माथेरान, सचिव माथेरान नागरी सहकारी पतसंस्था, अध्यक्ष वनसंरक्षक समिति माथेरान**

# पनवेल शहरातून मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातून २० हजार रुपये किंमतीची मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

आनंदा सावंत (५४) यांची २० हजार रुपये किंमतीची मोटार सायकल एमएच–४६–एके–८६९१ हिरोहोंडा कंपनीची करड्या रंगाची सिमरन मोटार कार सर्व्हीस सेंटरच्या समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## श्रीवर्धनमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत सेनेचा भगवा....

# कोलमांडला येथे सत्तांतर तर कारिवणे, गालसुरे आणि दिघी ग्रामपंचायत सेनेचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील चारही ग्रामपंचायत वर शिवसेनेचा भगवा फडकला आहे. कारिवणे, कोलमांडला, गालसुरे आणि दिघी ग्रामपंचायत मध्ये शिवसेनेने आपले वर्चस्व कायम राखले आहे. कारिवणे ग्रामपंचायत अगोदरच बिनविरोध झाली आहे. दिघी ग्रामपंचायत मधील पाच प्रभागापैकी प्रभाग १ मध्ये देविदास कावळे, काशी पवार व कल्पना कदम, प्रभाग २ मध्ये विपुल गोरीवले व प्रतीक्षा पवार, प्रभाग ३ मध्ये गोपाळ मेंदाडकर व अनिता वाघमारे, प्रभाग ४ मध्ये लक्ष्मण चिकाटी व लक्ष्मण भनगोजी, प्रभाग ५ मध्ये अनंत पवार, निर्मला कांदेकर व इरम पठाण हे विजयो झाले आहेत. दिघी मधील तेरा सदस्यां पैकी ९ जण सेनेचे उमेदवार होते. दिघी ग्रामपंचायत मध्ये एकूम पन्नास जण निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. गालसुरे ग्रामपंचायत मधील ३ प्रभागातील नऊ विजयी उमेदवारांमध्ये



चलेंद्र पोळेकर, इस्माईल माहिमकर रंजना सायगावकर, महेंद्र गोरीवले यांचा समावेश आहे तर एकूण अठराजण निवडणुकीत उतरले होते. कोलमांडला ग्रामपंचायत निवडणुकीत यंदा एकूण ऐकिवीस जण रिंगणात होते त्यापैकी संदीप पेंढारी, सुगंधा जाधव, नीलम वारे, नितीन जोशी व वर्ष जोशी यांचा विजय झाला आहे. श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती असलेल्या बाबुराव चोरगे यांची ग्रामपंचायत कारिवणे येथे देखील ग्रामपंचायत निवडणूक होती मात्र त्याठिकाणी सर्व उमेदवार बिनविरोध निवडणून आले होते. राज्यात सेने– काँग्रेस – राष्ट्रवादी चे सरकार असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रत्येक पक्षाने सोयीनुसार आपापली वेगळी चूल मांडली होती. स्थानिक पातळीवर गावआघाड्या झाल्या असल्या तरी श्रीवर्धन तालुक्यातील चारही निवडणुकीत सेनेचे वर्चस्व कायम राहिले आहे. कोलमांडला ग्रामपंचायत या अगोदर भाजप कडे होती मात्र सध्या तिथे परिवर्तन होऊन सेने कडे सत्तांतर झाले आहे.

# दिव्यांगांच्या मनात कुठेही इतरांवर अवलंबून असल्याची भावना राहू नये : वामन चुनेकर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये दिव्यांगासाठी पाच टक्के निधी हा राखीव आहे त्या निधीचा वापर हा दिव्यांगासाठी केला जाईल. असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य वामन चुनेकर यांनी बोर्ली ग्रामपंचायत कार्यलायात दिव्यांगाना ब्लँकेट वाटप कार्यक्रमात केले.

यावेळी व्यासपीठावर प्रभारी सरपंच मतीन सौदागर, माजी पंचायत समिती सदस्या प्रीती नलावडे, ग्राम सदस्य चेतन जाव–सेन, वैशाली वाघमारे, गणेश कट, जगीता कोटकर, नम्रता शिंदे, बोर्ली मच्छिमार सोसायटीचे चेअरमन कैलास कोटकर, फैरोजा छापेकर आदी मान्यवर उपस्थित होते. दिव्यांगाची ही संख्या वाढु नये. ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो की ज्या घरात दिव्यांग व्यक्ती जन्माला आली की त्या आई वडिलांना किती वेदना होत असतात. तेच सांगु शकतात. दिव्यांग बांधवांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटावा यासाठी शासनातर्फे विविध योजना कार्यान्वित आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या पाठीशी सदैव ग्रामपंचायत पाठीमागे असणार आहे. आज जो ब्लँकेट वाटप करण्यात आले आहे. यापूर्वी सुद्धा दिव्यांगाना ग्रामपंचायत मार्फत व्यवसाय वाढीसाठी हातगाडी देण्यात आली आहे. त्या हातगाडीचा लाभ वीस बांधवाना भेटला होता.उर्वरित दिव्यांग याचा लाभ मिळाला नव्हता. त्याचप्रमाणे यापूर्वी काही दिव्यांग यांच्या खात्यावर निधीही जमा करण्यात आला होता. शासनाने दिव्यांगांच्या राखीव ठेवलेला निधी हा दिव्यांग बांधवांसाठी हा निधी खर्च केला जाईल. असे प्रभारी सरपंच मतीन सौदागर यांनी सांगितले.

# ट्रेलरच्या धडकेने मोटार सायकलवरील एकाचा मृत्यू एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव ट्रेलरने पुढे चाललेल्या मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू तर त्याचा सहकारी जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील कळंबोली ते उरणकडे जाणाऱ्या मार्गावरील डी पॉईंटच्या अलीकडे घडली आहे.

रामदास काळे (३२) रा.कळंबोली व त्यांचे सहकारी प्रमोद कदम (३६) हे दोघे कळंबोली ते उरणकडे जाणाऱ्या मार्गावरील टी पॉईंटच्या बाजूने मोटार सायकलवरुन जात असताना पाठीमागून आलेल्या ट्रेलरच्या चालकाने आपल्या ताब्यातील हयगयीने व अविचाराने चालवून मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात प्रमोद कदम यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर रामदास काळे हे जखमी झाले आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही श्री.वसंत विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेकडून रामरत्न बिल्डर्स तर्फे प्रोपरायटर १) श्री.विनोद जैन, २) श्री.रमेश नाचरे, ३) विनोद चांदे यांनी पूर्ण विकसनाकरिता घेतलेली आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील
सर्व्हे नं. व हिस्सा नं.१२ ब

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सदर श्री.वसंत विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यामधील असणाऱ्या सभासदांच्या सदनिकेच्या मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१८/०१/२०२१

**सही/–**
**ॲड.सागर एस.जगे**
**वकील**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी,**
**टिळक रोड, पनवेल–४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९००४०८८३५३**

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०३/२०२१

१) श्रीमती.रंजना धर्मा भोपी
वय : ५४, धंदा : गृहिणी
२) श्री.मयुर धर्मा भोपी
वय : ३२, धंदा : शेती
रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.मनिषा वासुदेव ठाकूर
वय : ३४, धंदा : गृहिणी
रा.रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.धर्मा शंकर भोपी हे दि.१३/०९/२०२० रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.सिताबाई शंकर भोपी ह्या दि.२८/११/२०१६ रोजी मौजे : जुई–कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.धर्मा शंकर भोपी यांचे मालकीच्या मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही सिडकोतर्फे संपादीत करण्यात आलेली होती व आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | ९४ | ५० | १ | ०–१८–० |
| | | ४२ | २ | ०–५–६ |
| | | ३७ | २ | ०–१८–० |

सदरच्या मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.धर्मा शंकर भोपी यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.धर्मा शंकर भोपी यांचे वारसदार या नात्याने कै.धर्मा शंकर भोपी यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.धर्मा शंकर भोपी यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१८/१/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
अर्जदारांचे वकील : ॲड.प्रशांत भुजबळ

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०३/२०२१

१) श्री.दत्ता उर्फ दत्तात्रेय मोहन नाटेकर
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.वैशाली राजेश घाटे
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रेल्वे स्टेशन रोड, रेल्वे मालधक्का,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.दिपिका दिपक शिरगावकर
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धोपावे, खारवी वाडी, ढोपरे, रत्नागिरी
४) सौ.विक्रांती विकास जाधव
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धोपावे, खारवीवाडी, ढोपरे, रत्नागिरी — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीस नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.वत्सला मोहन नाटेकर यांचे निधन दि.०९/०६/२०२० रोजी झालेले आहे. कै.वत्सला मोहन नाटेकर यांचे पती कै.मोहन यशवंत नाटेकर यांचे निधन दि.१२/०२/१९८९ रोजी झालेले आहे. श्री.दत्ता उर्फ दत्तात्रेय मोहन नाटेकर, वगैरे ह्यांनी कै.वत्सला मोहन नाटेकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मौजे : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड

| युनिट केस नं. | बांधकाम क्र. | बांधकामाचा वापर | बांधकामाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| KOL-ICOGS-131 | KL-123, 124 | निवासी | ११८.७७ चौ.मी. |

वरील संपादीत मिळकतीपोटी पुनर्वसन व पुर्नस्थापना योजनेंतर्गत सिडकोकडून दि.११/०५/२०१८ रोजीच्या नोंदणीकृत भाडेपट्टा कराराद्वारे कै.वत्सला मोहन नाटेकर यांना मौजे : पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे वितरित करण्यात आलेल्या भूखंड नं.२९६, सेक्टर नं. आर ३, क्षेत्र ३६० चौ.मी. या भूखंडाबबात श्री.दत्ता उर्फ दत्तात्रेय मोहन नाटेकर, वगैरे हे कै.वत्सला मोहन नाटेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्री.दत्ता उर्फ दत्तात्रेय मोहन नाटेकर, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. वत्सला मोहन नाटेकर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/१/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.अरविंद चामले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, सो.पनवेल यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.५७७/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०१/२०२१

कै.रामा खंडू कोळी (मयत) तर्फे वारस
कै.नारायण खंडू कोळी (मयत) तर्फे वारस
१) कै.पांडुरंग नारायण कोळी (मयत) तर्फे वारस
कै.जानुकबाई पांडुरंग कोळी (मयत) तर्फे वारस
१.१) श्री.चंद्रकांत पांडुरंग कोळी
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
१.२) श्री.कृष्णा पांडुरंग कोळी
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
१.३) श्री.प्रकाश पांडुरंग कोळी
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
२) कै.अनंत नारायण कोळी (मयत तर्फे वारस)
२.१) बनीबाई अनंत कोळी
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती
२.२) नामदेव अनंत कोळी
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२.३) नरेश अनंत कोळी
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
२.४) दिपक अनंत कोळी
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.काळुराम नारायण कोळी
कै.आनंदी काळुराम कोळी (मयत तर्फे वारस)
३.१) श्री.हरी काळुराम उर्फ राम कोळी
वय : वर्षे, धंदा : शेती
३.२) श्री.दर्शन काळुराम कोळी
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
४) कै.गजानन नारायण कोळी (मयत तर्फे वारस)
कै.ठकीबाई गजानन कोळी (मयत तर्फे वारस)
४.१) आशा गजानन कोळी
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
५) कै.गंगुबाई गणपत कोळी (मयत तर्फे वारस)
५.१) राम गणपत कोळी
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
६) कै.लिलाबाई काना कोळी (मयत तर्फे वारस)
६.१) जनार्दन काना कोळी
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
६.२) नवनित काना कोळी
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
७) सिताबाई दशरथ कोळी
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.गव्हाण/बेलपाडा,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार क्र.१ ते ७ यांचे वडील, अ.क्र.१.१ ते १.३, २.१ ते २.४, ३.१ व ३.२, ४.१, ५.१, ६.१ व ६.२ चे आजोबा मयत कै.नारायण खंडू कोळी हे दि.१६/०६/२००१ रोजी मौजे : बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून ते येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
गाव : गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

| क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ३०४ | ९ | ०–०५–०० | ०.२७ |
| २ | ३१२ | ६ | ०–०८–४० | ०.७२ |
| ३ | ३०४ | १२ | ०–०१–०० | ०.०३ |
| | | एकूण | ०–१४–०० | |

व त्यांना पुढीलप्रमाणे वारसदार होते व आहेत.

| क्र. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| | कै.रामा खंडू कोळी (मयत) तर्फे वारस<br>कै.नारायण खंडू कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| १ | कै.पांडुरंग नारायण कोळी (मयत) तर्फे वारस<br>कै.जानुकबाई पांडुरंग कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| १.१ | श्री.चंद्रकांत पांडुरंग कोळी | ६० | मुलगा |
| १.२ | श्री.कृष्णा पांडुरंग कोळी | ५८ | मुलगा |
| १.३ | श्री.प्रकाश पांडुरंग कोळी | ४० | मुलगा |
| २ | कै.अनंत नारायण कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| २.१ | बनीबाई अनंत कोळी | ७५ | सुन |
| २.२ | नामदेव अनंत कोळी | ६० | नातू |
| २.३ | नरेश अनंत कोळी | ५८ | नातू |
| २.४ | दिपक अनंत कोळी | ४२ | नातू |
| ३ | श्री.काळुराम नारायण कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| ३.१ | श्री.हरी काळुराम उर्फ राम कोळी | | |
| ३.२ | श्री.दर्शन काळुराम कोळी | | |
| ४ | कै.गजानन नारायण कोळी (मयत) तर्फे वारस<br>कै.ठकीबाई गजानन कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| ४.१ | आशा गजानन कोळी | ४५ | नात |
| ५ | कै.गंगुबाई गणपत कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| ५.१ | राम गणपत कोळी | ६० | नातू |
| ६ | कै.लिलाबाई काना कोळी (मयत) तर्फे वारस | | |
| ६.१ | जनार्दन काना कोळी | ६० | नातू |
| ६.२ | नवनित काना कोळी | ४० | नातू |
| ७ | सिताबाई दशरथ कोळी | ७० | मुलगी |

वरील प्रमाणे सदर प्रस्तुत अर्जदार हे मयत कै.नारायण खंडू कोळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०१/२०२१
ठिकाण : पनवेल

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

